# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२९/०७/२०१६.

**१) महीलेच्या गळयातील सोन्याच्या गोपची चोरी . :—**

दिनांक २८/०७/२०१६ रोजी १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सुषमा वर्गीस नैनाल वय ४८ वर्ष, रा. गांधी वार्ड वरठी ही आठवडी बाजारात वरठी येथे बाजारात टमाटर घेण्या करीता गेली असतांना कोणीतरी अज्ञात चोराने तिच्या गळयातील सोन्याची चैन/गोप १३ ग्रॅम कि. १८,०००/—रु. चा माल चोरुन नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) घरातील नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक २७/०७/२०१६ रोजी १०.३० ते १६.३० वा. दर. यादवराव किसन लांजे वय ४८ वर्ष, रा. सोंडया तो आपल्या घराला कुलुप लावुन शेतावर गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण घराच्या समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन ड्रम मध्ये ठेवलेली रोख रक्कम ४०,०००/—रु. चा चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४५४,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चिचखेडे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहे.

**३) चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २८/०७/२०१६ रोजी १२.३० ते १३.४५ वा. दरम्यान यातील आरोपी अनिल कुकसु काशीवार वय ३८ वर्ष, रा. कोका याने फिर्यादीच्या घराच्या मागील खुल्या दारातुन आत प्रवेश करुन खिळकिचे लोखंडी सलाखी काडुन आत जावुन बेडरुमधील गोदरेज आलमारी खोलुन चोरी करण्याचा प्रयत्न करीत असतांना फिर्यादीचे आईला पाहुण पळुन गेला. असे फिर्यादी काशीनाथ बळीराम हातझाडे वय ३७ वर्ष, यांचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५४,३८०,५११ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) तरुणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०७/२०१६ रोजी १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही रस्त्याने आपल्या शेतात जेवणाचा डब्बा घेवुन जात असता यातील आरोपीने आपल्या मोटार सायकलने पाठलाग करुन आडवा झाला. व तिचा उजवा हात पकडुन 'तु मला आवडतेस आणि माझ्या सोबत बोलत का नाहीस' असे बोलुन तिचा विनयभंग केल्याने असे फिर्यादीचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३४१,३५४(ड) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :-

दिनांक २९/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, तुमसर, साकोली, लाखांदुर, व वरठी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७१ लिटर हातभट्टी दारू कि. १६,४८०/रु. व ६६० मि.ली. देशी+विदेशीदारु+मो.सा.१ कि. १३,७४०/-रु. तसेच जुगारातुन कि. १३,८१५/- रु. असा एकुण कि. ४४,०३५/-रू. चा माल जप्त करण्यात आला

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

२०|७|२६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता